## नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

वाचा :- १) या कार्यालयाचे दक्षता शाखेकडून दि.०१/०३/२०१२ रोजी प्राप्त झालेला अहवाल.
२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.१५/२०१२/जा.११५, दि.०३/०३/२०१२, १२/०३/२०१२ व १९/०४/२०१२.
३) मे. एकता वेअरहाऊसिंगचे मालक यांचे दि. ०७/०३/२०१२ रोजीचे निवेदन.
४) मे. पी.ई.सी. लिमिटेड व मे. डीसीएम श्रीराम कन्सोलिडेटेड लि. यांचे दि. २०/०३/२०१२ रोजीचे स्वतंत्र निवेदने व त्यासोबतचे कागदपत्रे.
५) मे. पी.ई.सी. लिमिटेड यांचे दि. २४/०४/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त निवेदन व त्यासोबतचे कागदपत्रे.
६) मे. डीसीएम श्रीराम कन्सोलिडेटेड लि. यांचे दि. ०२/०५/२०१२ रोजीचे निवेदन व त्यासोबतचे कागदपत्रे.

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.१५/२०१२/जा. ३३६
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इंशुरस इमारत, ५ वा मजला,
१४, ज.टाटा मार्ग, चर्चगेट, मुंबई - २०.
दिनांक :१७/०५/२०१२.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES HEAD OFFICE MUMBAI

## आ दे श

(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अवये)

### प्रकरणाची पार्श्वभूमी :-

दिनांक २७/०२/२०१२ रोजी उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांना खात्रीलायक बातमी मिळाली की, शीळ पनवेल मार्गावरील पिंपरी पाडा येथील एकता इंडस्ट्रीयल युनिट या नमुद पत्यावर कडधान्याचा विनापरवाना साठा करुन व्यवसाय केला जात असल्याचे मिळालेल्या बातमीची खातरजमा करण्यासाठी उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, हे पथक व पंचासमवेत एकता इंडस्ट्रीयल युनिट, रोड नं.ए-३, ओल्ड मुंब्रा तळोजा रोड, पिंपरी, नवी मुंबई या ठिकाणी नमूद गोदामावर येऊन पोहोचले. सदर जागेत प्रवेश केल्यावर उजव्या बाजूच्या एका गोदामात एक इसम काम करीत असल्याचे आढळून आले. अधिकाऱ्यांनी सदर इसमास त्यांची ओळख करुन देऊन भेटीचे प्रयोजन तसेच सदर इसमास त्याचे नाव विचारले असता त्याने त्याचे नाव दिपक शिवाजी देसाई असल्याचे सांगून तो या ठिकाणी व्यवस्थापकाचे काम करीत असल्याचे सांगितले. तद्नंतर अधिकाऱ्याने गोदामाची पाहणी केली असता त्यामध्ये बऱ्याच मोठ्याप्रमाणात कडधान्याचा साठा आढळून आला. याबाबत अधिकाऱ्यांनी उपस्थित

इसम नामे दिपक शिवाजी देसाई याचेकडे विचारणा केली असता त्याने असे सांगितले की, सदरची जागा केतन पटेल यांच्या मालकीची असून सदर जागेतील गोदाम क्रमांक ३, ७ व ८ अशा तीन गोदामांमध्ये वेगवेगळ्या कंपन्यांचा कडधान्याचा साठा विक्री करण्याकरीता साठवणूक केलेला असून सदर साठ्याबाबत लोडींग-अनलोडींग सर्व्हीस प्रोवायडर म्हणून काम पाहत असल्याचे सांगितले. याबाबत गोदामाचे मालक केतन पटेल हे त्यास रुपये ७०००/- याप्रमाणे मासिक पगार देत असल्याचे सांगितले. सदर जागेत तिन गोदामांमध्ये एकुण १८,५३,४०० किलो म्हणजेच १८५३४ क्विंटल कडधान्याचा साठा अस्तीत्वात असल्याचे सांगितले. याबाबत पंचांसमक्ष अधिकाऱ्यांनी तिनही गोदामांमधील कडधान्याच्या साठयाबाबत विचारणा केली असता दिपक शिवाजी देसाई यांनी सादर केलेल्या यादीनुसार खालील प्रमाणे साठा असल्याचे सांगितले.

गोदाम क्र. ३

| अ.क्र. | कंपनीचे नांव | साठा प्रकार | साठा तपशिल (किलो) | साठा तपशिल (क्विं) |
|---|---|---|---|---|
| १ | मे. राजीवा ट्रान्स्पोर्ट | तुर | २८५५० | २८५.५० |
| २ | मे. अदानी | तुर | १६८००० | १६८० |
| ३ | मे. सत्यनारायण पल्स मिल | तुर | २००००० | २००० |
| ४ | मे. पी.ई.सी. लिमिटेड | मुग | ७२००० | ७२० |
| | एकुण कडधान्याचा साठा | | ४६८५५० | ४६८५.५ |

गोदाम क्र. ७

| अ.क्र. | कंपनीचे नांव | साठा प्रकार | साठा तपशिल (किलो) | साठा तपशिल (क्विं) |
|---|---|---|---|---|
| १ | मे. डी. सी. एम. लिमिटेड | तुर | ७६५०० | ७६५ |
| २ | मे. सत्यनारायण पल्स मिल | तुर | २५०००० | २५०० |
| ३ | मे. पी.ई.सी. लिमिटेड | तुर | ४५४९०० | ४५४९ |
| | एकुण कडधान्याचा साठा | | ७८१४०० | ७८१४ |

गोदाम क्र. ८

| अ.क्र. | कंपनीचे नांव | साठा प्रकार | साठा तपशिल (किलो) | साठा तपशिल (क्विं) |
|---|---|---|---|---|
| १ | मे. कारगील इंडीया प्रा.लि. | चणा | ३४४०० | ३४४ |
| २ | मे. पी.ई.सी. लिमिटेड | तुर | २८८००० | २८८० |
| ३ | मे. सत्यनारायण पल्स मिल | तुर | २२५००० | २२५० |
| ४ | मे. अदानी | उडीद | ५६०५० | ५६०.५० |
| | एकुण कडधान्याचा साठा | | ६०३४५० | ६०३४.५० |

गोदाम क्र ३, ७ व ८ मध्ये आढळलेला कडधान्याचा एकुण साठा

| अ.क्र. | गोदाम | साठा तपशिल (किलो) | साठा तपशिल (क्विं.) |
|---|---|---|---|
| १ | गोदाम क्र ३ | ४६८५५० | ४६८५.५ |
| २ | गोदाम क्र ७ | ७८१४०० | ७८१४ |
| ३ | गोदाम क्र ८ | ६०३४५० | ६०३४.५० |
| | एकुण साठा | १८५३४०० | १८५३४ |

वरील नमुद कडधान्याच्या साठयाबाबत दिपक शिवाजी देसाई यांचेकडे अधिक विचारणा केली असता नमुद गोदामातील साठवणुक केलेल्या साठयाबाबत त्यांचेकडे साठवणुकीकरीता कोणताही परवाना उपलब्ध नसल्याचे सांगितले तसेच त्याकरीता मुंबई/ठाणे शिधावाटप यंत्रणेकडे कोणताही अर्ज केला नसल्याचे सांगितले. याबाबतचा दिपक शिवाजी देसाई यांचा पंचांसमक्ष लेखी जबाब नोंदवून घेण्यात आलेला आहे.

सदरच्या तिनही गोदामांमध्ये आढळून आलेला एकुण १८५३४०० किलो म्हणजेच १८५३४ क्विंटल कडधान्याचा साठा असुन तो बऱ्याच मोठया प्रमाणात असल्याने तसेच संबंधितांकडे त्याबाबत साठवणूकीबाबतचे कोणतेही परवाने किंवा आवश्यक कागदपत्र उपलब्ध नसल्याने याबाबत अधिक चौकशी होणे आवश्यक असल्याने अधिकाऱ्यांनी सदर गोदामामध्ये आढळून आलेल्या कडधान्याचा संपूर्ण साठा पंचांसमक्ष जागीच सिलबंद करुन उपस्थित इसम दिपक शिवाजी देसाई यांचेकडे सुपूर्दनाम्याद्वारे ताब्यात देण्यात येवून सदरचा साठा पुढील आदेशापर्यंत जैसे थे स्थितीत ठेवण्याचे व जतन करण्याच्या सुचना दिल्या.

तपासणीचे दरम्यान मे. एकता इंडस्ट्रीयल युनिट चे व्यवस्थापक दिपक शिवाजी देसाई यांनी गोदामात साठवणूक केलेल्या कडधान्याच्या साठामालकांकडून प्राप्त कागदपत्रांची अवलोकन केले असता, १) मे. रुची वर्ल्डवाईड लिमिटेड यांनी या कार्यालयास सादर केलेल्या माहे जानेवारी २०१२ या महिन्याच्या मासिक विवरणपत्राची छायांकित प्रत घटनास्थळी आढळून आली तथापी घटनास्थळी गोदामामध्ये सदर कंपनीचा प्रत्यक्षात कडधान्याचा साठा आढळून आलेला नाही. २) मे. डी. सी. एम. लिमिटेड यांनी या कार्यालयास सादर केलेल्या माहे जानेवारी २०१२ या महिन्याच्या मासिक विवरणपत्राची छायांकित प्रत घटनास्थळी आढळून आली तथापी विवरणपत्रामधील नमुद गोदामावरुन साठवणूक केलेला साठा व प्रत्यक्षात घटनास्थळी आढळून आलेला साठा यामध्ये तफावत असुन उर्वरीत साठयाचे तपशिल तसेच सदर साठयाचे बिल ऑफ एन्ट्री अथवा तत्संबंधी इतर पुरावादर्शक कागदपत्रे तपासणीचे वेळी उपलब्ध झाले नाही. ३) मे. सत्यनारायण पल्स मिल यांनी आयात केलेल्या तुर या कडधान्याचा साठयाच्या घटनास्थळी आढळून आलेल्या बिल ऑफ लेडींग च्या छायांकित प्रतींचे अवलोकन केले असता सदरचा साठा माहे डिसेंबर २०११ मध्ये आयात केल्याचे दिसुन येत असुन सदरच्या बिल ऑफ लेडींग

वरील नमुद कडधान्याचा साठा व प्रत्यक्षात घटनास्थळी आढळून आलेला साठा यामध्ये बरीच तफावत असुन उर्वरीत साठयाचे तपशिल तसेच सदर साठयाचे बिल ऑफ एन्ट्री अथवा तत्संबंधी इतर पुरावादर्शक कागदपत्रे तपासणीचे वेळी उपलब्ध झाले नाही. ४) उपरोक्त नमुद गोदामावरील जप्त करण्यात आलेल्या कडधान्याच्या साठयापैकी मे. राजीवा ट्रान्स्पोर्ट, मे. अदानी, मे. कारगिल इंडीया प्रा.लि. व मे. पी ई सी लिमिटेड या चारही कंपन्यांचा साठवणूक केलेला साठा हा आयात केला असल्यास सदर साठयाची बिल ऑफ एन्ट्री अथवा या कार्यालयास सादर करण्यात आलेल्या मासिक विवरणपत्राची छायांकित प्रत तसेच सदरचा साठा आयात केला नसल्यास त्याची खरेदी बिले अथवा इतर तत्संबंधी पुरावादर्शक कागदपत्रे तपासणीचे वेळी उपलब्ध झाले नाही.

उपरोक्त नमुद जप्त करण्यात आलेला कडधान्याचा साठा हा आयात केला असल्यास तो आयातदार यांच्या गोदामात साठवणूक केलेला नसुन मे. एकता वेअरहाऊस, रोड नं.ए-३, ओल्ड मुंब्रा तळोजा रोड, पिंपरी, नवी मुंबई या ठिकाणी असलेल्या केतन पटेल यांच्या गोदामात साठवणुक केल्याचे आढळुन आले आहे. मे. एकता इंडस्ट्रीयल युनिट चे मालक केतन पटेल यांचा कडधान्य या जीवनावश्यक वस्तुंच्या साठवणुकीचा व्यवसाय असुन त्यांनी त्यांच्या नमुद गोदामावर महाराष्ट्र शेडयुल्ड कमोडिटीज होलसेल डिलर्स लायसन्सिग ऑर्डर, १९९८ अन्वये साठवणुकीकरीता परवाना घेतला नसल्याचे तसेच त्याकरीता अर्जही केला नसल्याचे तसेच घटनास्थळी मे. एकता इंडस्ट्रियल युनिट चे मालक व आयातदार कंपनी यांच्या मधील साठवणुकीबाबतचा करारनामाही उपलब्ध नसल्याचे आढळून आले आहे. ही बाब गंभीर आहे. अशाप्रकारे मे. एकता इंडस्ट्रीयल युनिट, रोड नं.ए-३, ओल्ड मुंब्रा तळोजा रोड, पिंपरी, नवी मुंबई चे मालक केतन पटेल यांनी नमुद गोदामावर मोठया प्रमाणावर साठवणुक केलेला विनापरवाना कडधान्याचा साठा हा साठेबाजी करण्याच्या उद्देशाने असल्याचे दिसुन आल्याने तसेच दि महाराष्ट्र होलसेल डिलर्स लायसंसिंग ऑर्डर १९९८ व पर्यायाने जीवनावश्यक वस्तू कायदा १९५५ मधील तरतुदींचा भंग केल्याचे निदर्शनास आल्याने अधिकाऱ्यांनी पुढील तपासणीचे अधिन राहून उपरोक्त नमूद जीवनावश्यक वस्तूंचा साठा घटनास्थळीच जप्त केला आहे.

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ प्रमाणे विल्हेवाट लावण्याची विनंती उपनियंत्रक शिधावाटप (अंमल), मुंबई यांनी केलेली असून जीवनावश्यक वस्तुंमधील कडधान्य या अनुसूचीत वस्तूंचा साठेबाजीच्या उद्देशाने साठवणूक केलेला विनापरवाना साठा शासनजमा का करण्यात येवू नये ? याबाबत वाचा क्र.२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे सर्व संबंधितांना कारणे दाखवा नोटीस बजावून त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देण्यात आली असून त्याकरीता या कार्यालयात दि.०७/०३/२०१२ रोजी सुनावणी ठेवण्यात आली.

दिनांक ०७/०३/२०१२ रोजीच्या सुनावणीस मे. एकता वेअरहाऊसचे मालक केतन बी. पटेल यांनी उपस्थित राहून त्यांचे वाचावे क्र. ३ अन्वये लेखी निवेदन सादर केले. सदर सुनावणीस मे. पी.ई.सी. लिमिटेड व मे.

डीसीएम श्रीराम कन्सोलिडेटेड लि. हे साठा मालक उपस्थित राहिले नाहीत. सबब, सर्व संबंधितांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी पुढील सुनावणी दिनांक २०/०३/२०१२ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक २०/०३/२०१२ रोजीच्या सुनावणीस मे. पी.ई.सी. लिमिटेड या कंपीनीच्या वतीने व्ही.टी. सुर्यवंशी व मे. डीसीएम श्रीराम कन्सोलिडेटेड लि. या कंपनीच्या वतीने निखिल जे. पुणेवाला यांनी उपस्थित राहून वाचावे क्र. ४ अन्वये स्वतंत्र लेखी निवेदने व त्यासोबत आयात संबंधीचे कागदपत्रे सादर केले. मे. पी.ई.सी. लिमिटेड या कंपनीने निवेदनासोबत सादर केलेल्या आयात संबंधीच्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता, बिल ऑफ एन्ट्री क्र. ८८८०५३ दिनांक २३/१०/२०१० अन्वये १००२ क्विंटल मुगचा साठा, बिल ऑफ एन्ट्री क्र. ८८७२५८ दिनांक २६/१०/२०१० अन्वये १००८० क्विंटल तसेच बिल ऑफ एन्ट्री क्र. ९९३५३३ दिनांक १५/१२/२०१० अन्वये ४८०९.६० क्विंटल असा एकूण १४८८९.६० क्विंटल तुरचा साठा आयात केल्याचे कागदपत्रे सादर केली आहेत. सदरचा सन २०१० मध्ये आयात केलेला साठा हा नमूद गोदामावर आजमितीस साठवणूक करण्याचे प्रयोजन काय? याबाबत पुरावदर्शक कागदपत्रांसह अधिक खातरजमा करण्यासाठी तसेच मे. डी. सी. एम. श्रीराम कन्सोलिडेटेड लि. यांचा गोदाम क्र. ७ मध्ये ७६५.०० क्विंटल तुर या कडधान्याचा साठा नमूद गोदामावर जप्त करण्यात आलेल्या साठ्याच्या पुराव्यादाखल सादर केलेली कागदपत्रे पडताळली असता, आयात केलेला तुर या कडधान्याचा साठा त्यांनी बिल ऑफ एन्ट्री क्र. ९३९८४९ दिनांक ०९/११/२०१० रोजी एकूण ४५६१ बाचक्यामध्ये २२८५.०६ क्विंटल, बिल ऑफ एन्ट्री क्र. ९८४८३२ दिनांक ०१/१२/२०१० रोजी एकूण २३६० बाचक्यांमध्ये ११८०.०० क्विंटल, बिल ऑफ एन्ट्री क्र. ६४९७३२ दिनांक ०७/०१/२०११ रोजी एकूण २४०० बाचक्यांमध्ये १२०२.४० क्विंटल व बिल ऑफ एन्ट्री क्र. ६५६१३६ दिनांक ११/०१/२०११ रोजी एकूण २४०० बाचक्यांमध्ये ११९७.३८ क्विंटल असे मिळून एकूण ११७२१ बाचक्यांमध्ये ५८६४.८४ क्विंटल तुर या कडधान्याचा साठा आयात केल्याचे उपलब्ध आयात संबंधीचे कागदपत्रावरुन दिसून येत आहे. त्यापैकी सन २०१० मध्ये आयात केलेला साठा हा प्रति किलो २५/- रुपये व सन २०११ मध्ये आयात केलेला साठा हा प्रति किलो २७/- रुपये या दराने खरेदी केल्याचे बिल ऑफ एन्ट्रीवरुन दिसून येते. सबब, मे. डीसीएम श्रीराम कन्सोलिडेटेड लि. यांचा नमूद गोदामामधील साठवणूक केलेला तुर या कडधान्याचा साठा हा आजमितीस विक्री न करता साठवणूक करण्याचे प्रयोजन काय ? याबाबत साठेबाजी व नफेखोरीचा उद्देश असल्याची साशंकता वाटल्याने सर्व संबंधितांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी अंतीम सुनावणी दिनांक ०२/०५/२०१२ रोजी सुनावणी ठेवण्यात आली.

दिनांक ०२/०५/२०१२ रोजीच्या सुनावणीस मे. पी.ई.सी. लिमिटेड या कंपीनीच्या वतीने चिफ मार्केटिंग मॅनेजर श्री. प्रकाश वंजानी व मार्केटिंग मॅनेजर श्री. एस.सी. सहा यांनी उपस्थित राहून त्यांनी यापूर्वी वाचावे क्र. ५ अन्वये दिलेले लेखी निवेदन कायद असल्याचे सांगितले. सदरचा कडधान्याचा साठा खाजगी गोदामात साठवणूक

केला असल्याने याबाबत गोदाम मालक सोबतचा करारनामा सादर करणेबाबत सुचित केले असता, तसा करारनामा नसल्याचे सांगितले व सदरचा साठा सुमारे दोन वर्षापासून साठवणूक करण्याचे प्रयोजन काय ? याबाबतही समाधानकारक उत्तर दिले नाही. तसेच सदर सुनावणीस मे. डीसीएम श्रीराम कन्सोलिडेटेड लि. या कंपनीच्या वतीने श्री. नितीन गुप्ता यांनी उपस्थित राहून वाचावे क्र. ६ अन्वये लेखी निवेदन सादर केले. सबब, दोन्ही कंपन्यांना आयात साठ्याचे क्वॉरनटाईन प्रमाणपत्र सादर करण्याबाबत सुचित करुन सदरची पूर्तता झाल्यानंतर प्रकरण गुणवत्तेवर निर्णयास्तव राखीव ठेवण्यात आले.

**युक्तिवाद :-**

दिनांक ०७/०३/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित राहीलेले मे. एकता वेअरहाऊसचे मालक केतन बी. पटेल यांनी युक्तीवाद केला की, त्यांच्या नमूद गोदामावर साठवणूकीची व्यवस्था असून ते आयात केलेल्या कारगोमधील कडधान्याचा साठा त्यांच्या गोदामावर प्रत्येक गोणीमागे दर आकारुन साठवणूकीचा व्यवसाय करतात. तसेच मे. अदानी विलमर लि. यांनी कडधान्यांच्या साठ्याबाबत आयात संबंधीचे आवश्यक कागदपत्रे सादर केली असून उर्वरित साठा मालकांना पुढील सुनावणीमध्ये आयात संबंधीचे आवश्यक कागदपत्रे सादर करण्याच्या सुचना देण्यात आले असल्याचे सांगून तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक २०/०३/२०१२ रोजीच्या सुनावणीस मे. पी.ई.सी. लिमिटेड या कंपनीच्या वतीने उपस्थित राहीलेले व्ही.टी. सुर्यवंशी यांनी कंपनीच्या वतीने युक्तीवाद केला की, मे. पी.ई.सी. लिमिटेड ही कंपनी भारतीय सरकारचे उपक्रम असून त्यांनी एकता वेअरहाऊसमध्ये साठवणूक केलेला कडधान्याचा साठा हा आयात केलेला असून सोबत बिल ऑफ एन्ट्री, बिल ऑफ लेडिंग व इतर आयात संबंधीचे कागदपत्रे सादर केली आहेत. आपल्या कार्यालयास नियमित सादर केलेल्या माहे एप्रिल २०११ ते माहे फेब्रुवारी २०१२ या कालावधीचे मासिक विवरणपत्राचे छायांकित प्रति अवलोकनार्थ सादर करण्यात येत असून आपल्या निदर्शनास आणून देण्यात येत आहे की, सदरचा आयात केलेला साठा हा इतर राज्यांमध्ये सार्वजनिक वितरण प्रणालीवर वितरीत करावयाचा साठा आहे. सोबत आंध्रप्रदेश राज्याचे वितरण आदेश जोडण्यात आले असून त्यांनी सादर केलेले सर्व कागदपत्रांची पडताळणी करुन त्यांचा एकता वेअरहाऊसमधील जप्त करण्यात आलेला साठा मुक्त करण्याची विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक २०/०३/२०१२ रोजीच्या सुनावणीस मे. डीसीएम श्रीराम कन्सोलिडेटेड लि. या कंपनीच्या वतीने उपस्थित राहीलेले निखिल जे. पुणेवाला यांनी कंपनीच्या वतीने युक्तीवाद केला की, दिनांक २७/०२/२०१२ रोजी ठाणे शिधावाटप भरारी पथकाचे श्री. शेवाळे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली असलेल पथक एकता वेअरहाऊस, तळोजा येथे गेले व तेथे असलेल्या धान्य साठ्याची माहिती घेतली असता, त्या गोडावूनमध्ये त्यांचा डी.सी.एम. चा

CONTROLLER OF RATIONING

माल तुर होता. तरी त्यांनी गोडावूनला दिलेल्या निवेदनात नोंद केली आहे. गोडावून व्यवस्थापनला सांगितले आहे की, ज्यांचा माल आहे त्यांनी त्या मालाच्या संदर्भातील कागदपत्रे चर्चगेट ऑफिसला दाखविणे व त्यांच्याकडून माल सोडविण्याचा आदेश घेणे. ते निदर्शनास आणू इच्छितात की, त्या गोडावूनमध्ये आयात केलेले तूर ७६५ क्विंटल बाकी आहे. त्याची माहिती ते दर महिन्याला स्टॉक रिपोर्ट चर्चगेट ऑफिसला व पनवेल रेशनिंग ऑफिसला देत आले आहे. या निवेदनासोबत त्यांनी चर्चगेट रेशनिंग कार्यालयातील व पनवेल येथील सही शिक्का असलेले स्टॉक स्टेटमेंट झेरॉक्स प्रत जोडत असल्याचे तसेच माल अयात केल्याचा पुरावा म्हणून बी.एल. आणि बी.ई. ची कॉपी जोडत आहे. तरी गोडावून व्यवस्थापनेला त्यांच्या डी.सी.एम. मालाची डिलिव्हरीसाठी परवानगी द्यावी, अशी विनंती करुन तसे कंपनीचे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक ०२/०५/२०१२ रोजीच्या सुनावणीस मे. पी.ई.सी. लिमिटेड या कंपनीच्या वतीने उपस्थित राहीलेले कंपीनीच्या वतीने चिफ मार्केटिंग मॅनेजर श्री. प्रकाश वंजानी व मार्केटिंग मॅनेजर श्री. एस.सी. सहा यांनी युक्तीवाद केला की, तुर व मुग या कडधान्यांच्या आयात केल्या संबंधीचे आवश्यक कागदपत्रे निवेदनासोबत सादर केली असून त्यामध्ये बिल ऑफ एन्ट्री, बिल ऑफ लेडिंग, टेस्ट रिपोर्ट, कमर्शिअल इन्व्हाईस व पायथो सेनिटरी सर्टिफिकेटच्या छायांकित प्रती सादर केल्या असून सदरचा साठा हा त्यांच्या बहुमुल्य ग्राहकास विक्री केला असल्याने जप्त करण्यात आलेला साठा लवकरात लवकर मुक्त केल्यास तो संबंधित खरेदीदारास वितरीत करण्यात येईल, अशी विनंती करुन कंपनीचे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक ०२/०५/२०१२ रोजीच्या सुनावणीस मे. डीसीएम श्रीराम कन्सोलिडेटेड लि. या कंपनीच्या वतीने श्री. नितीन गुप्ता यांनी युक्तीवाद केला की, त्यांच्या कंपनीने तुर या कडधान्याचा साठा सन २०१०-२०११ या वर्षामध्ये बिल ऑफ एन्ट्री अन्वये बाहेरुन आयात केलेला साठा मुंबई येथे दाखल झाला. त्यांच्याकडे मुंबईत साठवणूकची सुविधा नसल्याने ते एकता वेअरहाऊस, जुना मुंब्रा तळोजा रोड, नवी मुंबई या गोदामात साठवणूक करुन गोदाम मालकास याबाबतची रक्कम अदा केली जाते. आयात केलेला कडधान्याचा साठा हा व्यवसायासाठी केला असून त्यामध्ये भरपूर रक्कम गुंतविल्यानंतर काही प्रमाणात नफा होत असल्याचे सांगून दुर्भाग्याने सदरचा तुरचा साठा हा अपेक्षेप्रमाणे विक्री न झाल्याने तो नमूद गोदामावर पडून असल्याचे सांगितले. नियमानुसार नमूद गोदामात साठवणूक केलेल्या साठ्याची माहिती मासिक विवरणपत्राद्वारे या कार्यालयात व पनवेल येथील कार्यालयात सादर करीत असल्याचे सांगून त्याची स्थळप्रत त्यांच्याकडे उपलब्ध असल्याचे सांगितले. या बाबींवरुन आपणांस समाधान होईल की त्यांचा गैरमार्गाने जीवनावश्यक वस्तूंच्या साठवणूकीचा उद्देश नसून ज्यामुळे मालाचा कमी पुरवठा झाल्याने तोच माल जास्त किंमतीवर विकत नसल्याचे सांगून त्यांचे सर्व अभिलेख पारदर्शक असल्याचे

0007

सांगितले. तुर या कडधान्याच्या साठ्यापैकी एप्रिल २०११ ते ६ फेब्रुवारी २०१२ या कालावधीमध्ये त्यांना मिळालेल्या ऑर्डरनुसार काही प्रमाणात विक्री करुन त्यापुढे १७० मे. टन तुर या कडधान्याच्या साठ्याचे ऑर्डर असून सुध्दा साठा जप्त असल्याने त्यांनी विक्री केला नसल्याचे सांगितले. सदरचा साठा त्यांनी अथक प्रयत्न करुनही काही कारणास्तव विक्री होत नसल्याचे सांगून पुरावादाखल सदर कालावधीचा दरतक्ता जोडण्यात आला आहे. सदरचा साठा हा अंतीम उत्पादित नसल्याने व्यापाऱ्यांना यापेक्षा कमी दरात अंतीम उत्पादित साठा बाजारात उपलब्ध असल्याने त्यांनी विक्री केला नसल्याचे सांगितले. सदर साठ्यासाठी योग्य खरेदीदार मिळाला नसल्याने त्यांनी विक्री केला नसल्याने त्यांचा साठ्याबाजी अथवा जादा नफेखोरीचा उद्देश नसून त्यांचा प्रामाणिक हेतू असल्याने जप्त करण्यात आलेला साठा मुक्त करण्यात यावा. जेणेकरुन सदरचा साठा लवकरात लवकर विक्री करण्यात येईल. तसेच याबाबत हमी देण्यात की, मुक्त केल्यानंतर पुढील ६० दिवसात विक्री करुन तसा दैनंदिन अहवाल आपण केलेल्या मागणीनुसार सादर करण्यात येईल. याबाबत इंडियन पल्सेस ॲण्ड ग्रेन्स असोसिएशन या संस्थेनेही आयात असलेल्या साठ्यासाठी साठा मर्यादा नसल्याचे आपल्या कार्यालयात दिनांक ०३/०४/२०१२ रोजीच्या निवेदनाद्वारे कळविण्यात आले आहे. तरी त्यांचा जप्त असलेल्या साठ्याबाबत हमी देण्यात येते की, ते कोणत्याही साठेबाजीच्या प्रक्रियेत अथवा त्यामुळे होण्याऱ्या कृत्रिम भाववाडीच्या प्रक्रियेत सहभाग होणार नसल्याचे हमी देत असल्याने त्यांचा प्रामाणिक व्यवसाय गृहित धरुन जप्त करण्यात आलेला कडधान्याचा साठा मुक्त करण्याची विनंती केली.

मे. पी.ई.सी. लिमिटेड यांनी दिनांक ०४/०५/२०१२ रोजी टपालामार्फत सादर केलेल्या लेखी निवेदनासोबत आयात साठ्याबाबतचे कॉरनटाईन प्रमाणपत्र सादर करुन नमूद केले की, मे. नरेंद्र फॉरवर्डस प्रा.लि. हे त्यांचे कस्टम हाऊस एजन्ट असून त्यांच्यावर आयात झालेल्या साठ्याची कस्टम क्लिअरन्स व साठवणूकीची जबाबदारी देण्यात आलेली आहे. त्यानुसार त्यांनी दिनांक १३/०१/२०१२ रोजीच्या पत्रान्वये कडधान्याचा साठा एकता वेअरहाऊसमध्ये साठवणूक केल्याचे नमूद केले आहे. एकता वेअरहाऊसमधील साठवणूक करण्यात आलेला साठा हा आंध्रप्रदेश शासनाशी संबंधित असून त्यांच्याकडून पेमेन्टची प्रक्रिया धिम्या गतीने होत असल्याने परिणामी सदर साठ्याची उचल व वितरण अद्याप झाली नसल्याची सांगितले. तरी एकता वेअरहाऊसमधील जप्त करण्यात आलेला साठा हा आंध्रप्रदेश शासनास वितरीत करावयाचा असल्याने मुक्त करण्याची विनंती केली आहे.

मे. डीसीएम श्रीराम कन्सोलिडेटेड लि. यांनी दिनांक ०७/०५/२०१२ रोजी टपालामार्फत सादर केलेल्या लेखी निवेदनासोबत आयात साठ्याबाबतचे कॉरनटाईन प्रमाणपत्र सादर करुन मागणी नुसार आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केली असल्याचे नमूद केले आहे.

निष्कर्ष :-

प्रस्तुत प्रकरणातील अपचारी यांचा युक्तिवाद, निवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

प्रस्तूत प्रकरणी, दिनांक २७/०२/२०१२ रोजी उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांना खात्रीलायक बातमी मिळाली की, शीळ पनवेल मार्गावरील पिंपरी पाडा येथील एकता इंडस्ट्रीयल युनिट या नमुद पत्यावर कडधान्याचा विनापरवाना साठा करुन व्यवसाय केला जात असल्याचे मिळालेल्या बातमीची खातरजमा करण्यासाठी उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, हे पथक व पंचासमवेत एकता वेअरहाऊस, रोड नं.ए-३, ओल्ड मुंब्रा तळोजा रोड, पिंपरी, नवी मुंबई या ठिकाणी असलेल्या गोदामास अचानक भेट देऊन तेथील गोदाम क्र. ३, ७ व ८ या गोदामात साठवणूक करण्यात आलेल्या वरील नमूद विविध आस्थापनांचा मोठ्या प्रमाणात कडधान्यांचा साठा हा विनापरवाना अथवा घटनास्थळी साठासंबंधी आवश्यक कागदपत्रे उपलब्ध नसल्याने पुढील तपासणीच्या अधीन राहून सदरचा संपूर्ण साठा पंचासमक्ष जागीच सिलबंद करुन गोदामात उपस्थित इसम दिपक शिवाजी देसाई यांच्याकडे सूर्पूदनाम्याद्वारे ताब्यात देण्यात येऊन सदरचा साठा पुढील आदेशापर्यंत जैसे थे स्थितीत ठेवण्याचे व जतन करण्याच्या सुचना दिल्या.

मे. अदानी विलमर लि. यांनी या प्रकरणी त्यांचा जप्त करण्यात आलेल्या तुर व उडिद या कडधान्यांचा साठा आयात केल्याबाबत या कार्यालयास मासिक विवरणपत्र नियमितपणे सादर करुन उपरोक्त आयात साठ्याबाबतचे सर्व कायदेशीर कागदपत्रे सादर केलेले असल्यावरुन मे. अदानी विलमर लि. यांचा आयात केलेला साठा हा नजिकच्या कालावधीतला तसेच वैध असल्याचे सकृतदर्शनी दिसून आल्याने मे. अदानी विलमर लि. यांचा सिल करण्यात आलेला तुर व उडिद या कडधान्यांचा संपूर्ण साठा या कार्यालयाचे आदेश क्र. निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.१५/२०१२/जा. १४४ दिनांक १५/०३/२०१२ अन्वये मुक्त करण्यात आला आहे. तसेच मे. राजीवा एक्सपोर्टस, मे. सत्यनारायण पल्स मिल व मे. कारगील इंडिया प्रा.लि. यांचा सिल करण्यात आलेला विविध कडधान्यांचा संपूर्ण साठा हा नजिकच्या कालावधीतला तसेच वैध असल्याचे सकृतदर्शनी दिसून आल्याने या कार्यालयाचे आदेश क्र. निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.१५/२०१२/जा. २४९ दिनांक १९/०४/२०१२ अन्वये मुक्त करण्यात आला आहे.

केंद्र शासनाची अधिसुचना क्र. एस.ओ.२२२७ (अ), दिनांक २७ सप्टेंबर, २०११ अन्वये डाळी/कडधान्य व खाद्यतेल या अनुसुचित वस्तूंवर दिनांक ३०/०९/२०१२ पर्यंत निर्बंध आहेत. तथापी, "Central Government or State Government may direct the Importers to declare the receipts of stocks of these commodities and stocks retained by them" असे निर्देश दिलेले आहेत. तसेच शासन परिपत्रक

क्र. ईसीए-१००८/६२२/प्र.क्र.२८४/ना.पु.२३ दिनांक २० मे, २००८ अन्वये डाळीसाठी साठा मर्यादा व परवाना घेण्याची आवश्यकता याबाबत लागू केलेले निर्बंध हे आयात केलेल्या डाळींसाठी लागू राहणार नाहीत. त्यामुळे आयात केलेल्या डाळींच्या साठवणूक व प्रक्रियेसाठी व्यापाऱ्यांना परवाना घेण्याची आवश्यकता नाही. तथापी, त्यांनी आयात केलेल्या डाळीची खरेदी विक्री केल्यास यापुढे पुढील महिन्याच्या १० तारखेपर्यंत संबंधित जिल्हा पुरवठा अधिकारी/अन्नधान्य वितरण अधिकारी/उपनियंत्रक शिधावाटप यांचेकडे रिटर्न्स भरावेत. रिटर्न्स भरतांना त्यामध्ये कंपनीच्या मालकाचे नांव, नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता, गोदामाचा पत्ता, सुरुवातीची शिल्लक, आयात केलेल्या डाळीचा तपशिल, विक्री केलेल्या डाळीचा तपशिल, शिल्लक साठा इत्यादींचा स्पष्ट उल्लेख असावा असे नमूद आहे. तसेच आयात डाळीची विक्री करताना पावतीवर " Imported pulses " असा स्पष्ट उल्लेख करावा व आयात केलेल्या डाळीवरील क्रमांक व दिनांक पावतीवर स्पष्टपणे नमूद करुन बिल ऑफ एन्ट्रीची एक सत्य प्रत संबंधितांना द्यावी, असे नमूद आहे.

मे. पी.ई.सी. लिमिटेड ही कंपनी भारतीय सरकारचे उपक्रम असून सदर कंपनीकडे केंद्र शासनाकडून मिळालेल्या अनुदानातून विविध कडधान्यांचा साठा हा आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतून खरेदी करुन सदरचा आयात केलेला साठा हा राष्ट्रीय बाजारपेठेत मुबलग प्रमाणात व योग्य दरात वितरण करण्याची जबाबदारी सोपविण्यात आलेली आहे. आयात केलेला कडधान्य/अन्नधान्याचा साठा हा खुल्याबाजारात वाजवी दराने जनसामान्यांच्या मागणीनुसार उपलब्ध करुन दिल्यास जीवनावश्यक वस्तूंच्या भाववाढ रोखण्यास मदत होते. ज्यामुळे केंद्र शासनास तसेच पर्यायाने राज्य शासनास साठेबाजी व काळाबाजारीस आळा घालणे शक्य होत आहे. मे. पी.ई.सी. लिमिटेड या कंपनीने आयात केलेला मुग व तुर या कडधान्यांचा साठा आजमितीस खुल्याबाजारात अथवा संबंधीत राज्यांच्या मागणीनुसार सार्वजनिक वितरण प्रणालीवर शासन नियंत्रित दराने वितरीत न करता सदरचा साठा नमूद गोदामात साठवणूक करण्याचे प्रयोजन काय ? याबाबत साशंकता वाटते. सदर कडधान्याचा साठा हा जास्त कालावधीकरीता साठवणूक केल्याने प्रति माह होणारा साठवणूकीचा व फवारणीचा अनावश्यक खर्च हा विनाकारण वाढत असल्याचे दिसून येत आहे. आंतरराष्ट्रीय तसेच राष्ट्रीय बाजारपेठेत कडधान्य/अन्नधान्याचे भाव स्थिर नसल्याने प्रचलित दराने खरेदी केलेला साठा हा त्याच वेळेस तात्काळ वितरीत झाले असते, तर साठवणूक व इतर बाबींसाठी होणारा अनावश्यक खर्च सहजरित्या टाळता येणे शक्य झाले असते, अशी या कार्यालयाची धारणा आहे. तसेच कडधान्याचा साठा हा नाशवंत असल्याने सदरचा साठा हा खराब झाल्यास केंद्र शासनाचे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. मे. पी.ई.सी. लिमिटेड या कंपनीने आयात केलेल्या साठ्याची प्रशासकीय, वितरणासंबंधीच्या तसेच साठवणूकीच्या कामकाजाकरिता मे. नरेंद्र फॉरवडर्स प्रा.लि. या कंपनीची नेमणूक करण्यात आल्याचे दिसून येत आहे. मे. नरेंद्र फॉरवर्डस् प्रा.लि. या कंपनीचे श्री. व्ही. टी. सुर्यवंशी यांनी सुनावणीस उपस्थित



CONTROLLER OF RATIONING HEAD MU

राहून केलेल्या खुलाशात, सदरचा साठा विविध राज्यांमधून पी.डी.एस. करिता आयात केल्याचे सांगितले. सादर केलेल्या कागदपत्रांमध्ये दिनांक २७/०२/२०१२ रोजी तपासणीच्या दिवशीच या कार्यालयात सादर केलेल्या मासिक विवरणपत्रामध्ये एकता केअर टेकर व एकता एन.एफ.पी.एल. मधील साठवणूक केलेल्या कडधान्यांचा तपशिल सादर केला असून त्यामध्ये तुर या कडधान्याचे ३५४४१ बाचक्यांमध्ये सुमारे १७७२०.५० क्विंटल तसेच मुग या कडधान्याचे २०६४ बाचक्यांमध्ये सुमारे १०३२ क्विंटल साठा साठवणूक केल्याचे नमूद आहे. तपासणीमध्ये जप्त करण्यात आलेला कडधान्यांचा साठा व मासिक विवरणपत्रामधील नमूद कडधान्यांचा साठा यामध्ये बरीच तफावत असल्याचे आढळून येत आहे. निवेदनासोबत जोडण्यात आलेल्या इतर कागदपत्रांचे अवलोकन केले असता, बिल ऑफ एन्ट्री क्र. ८८८०५३ दिनांक २३/१०/२०१० अन्वये १००२ क्विंटल मुगचा साठा, बिल ऑफ एन्ट्री क्र. ८८७२५८ दिनांक २६/१०/२०१० अन्वये १००८० क्विंटल तसेच बिल ऑफ एन्ट्री क्र. ९९३५३३ दिनांक १५/१२/२०१० अन्वये ४८०९.६० क्विंटल असा एकूण १४८८९.६० क्विंटल तुरचा साठा आयात केल्याचे कागदपत्रे सादर केली आहेत. वास्तविक पाहता संबंधित राज्यांच्या मागणीनुसार त्यांना सार्वजनिक वितरण प्रणालीवर अनुदानित दराने वितरीत करावयासाठी कडधान्यांचा साठा आयात केला जात असल्याची या कार्यालयाची धारणा आहे. सदरचा जप्त कडधान्यांचा साठा हा सुमारे १७ महिन्यापूर्वी आयात केलेला असून तो अद्याप संबंधित राज्यांना वितरण न करण्याचे प्रयोजन काय ? सबब, जप्त साठा हा सादर केलेल्या बिल ऑफ एन्ट्रीवरील साठा असल्याबाबत साशंकता वाटते. घटनास्थळी अथवा सुनावणीमध्ये मे. एकता वेअरहाऊसच्या गोदाम मालकासोबतचे साठवणूक करण्याबाबतचा करारनामा आढळून आला नाही. सदर बाब गंभीर असून सदरचा कडधान्यांचा साठा इतर राज्यांमधील सार्वजनिक वितरण व्यवस्थेमधील पात्र शिधापत्रिकाधारकांना वितरीत करावयाचा अनुदानित साठा असल्यास त्याचा लेखाजोगा व ताळमेळ असणे गरजेचे आहे. तसेच प्रचलित पध्दतीनुसार केंद्र शासनाकडून व पर्यायाने संबंधित राज्य शासनाकडून मोठ्या प्रमाणावर अनुदानित असलेला कडधान्यांचा साठा हा खाजगी गोदामात जरी साठवणूक करावयाचा असल्यास तसा अधिकृत करारनामा संबंधित गोदाम मालका बरोबर असणे आवश्यक आहे. सदरचा कडधान्याचा साठा खाजगी गोदामात साठवणूक केला असल्याने याबाबत गोदाम मालक सोबतचा करारनामा सादर करणेबाबत सुचित केले असता, तसा करारनामा नसल्याचे सांगितले व सदरचा साठा सुमारे दोन वर्षापासून साठवणूक करण्याचे प्रयोजन काय ? याबाबतही मे. पी.ई.सी. लिमिटेड या कंपनीच्या अधिकाऱ्यानी समाधानकारक उत्तर दिले नाही. ही बाब अत्यंत गंभीर व संशय निर्माण करणारी आहे. मे. पी.ई.सी. लिमिटेड या कंपनीच्या मुंबई शाखेतील अधिकाऱ्यांना या कार्यालयाचे पत्र क्र. निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.१५/२०१२/ जा.१७८ दिनांक २६/०३/२०१२ अन्वये व वेळोवेळी जप्त मुद्देमालाच्या विल्हेवाटी संबंधी कारणेदाखवा नोटीस बजावून या सर्व साशंकता निर्माण करण्याऱ्या बाबींवर समक्ष उपस्थित राहून पुरावादर्शक अभिलेख व कागदपत्रांसह

खुलासा सादर करण्यासाठी पाचारण केले असतानाही संबंधीत कंपनीचे अधिकारी वर्ग हे दिनांक ३०/०४/२०१२ पर्यंत या कार्यालयात अनुपस्थित राहिल्याने त्यांनी या कार्यालयाच्या न्यायिकवत (Quasi Judicial Process) प्रक्रियेमध्ये सहकार्य न केल्याने सदरचा जप्त करण्यात आलेला एकता वेअरहाऊसमधील मुग व तुर या कडधान्यांच्या साठ्याबाबत साशंकता वाटते. तसेच दिनांक ०२/०५/२०१२ रोजीच्या सुनावणीस मे. पी.ई.सी. लिमिटेड या कंपनीच्या अधिकारी वर्गाने सुनावणीस उपस्थित राहून केवळ मोघम स्वरुपाचे निवेदन देऊन सोपस्कर पूर्ण केल्याचे दिसून येते. तसेच या तपासणीमध्ये जप्त करण्यात आलेला मुग व तुर या कडधान्यांचा साठा हा त्यांनी सादर केलेल्या बिल ऑफ एन्ट्री वरील साठा असल्याचे ते पुरेशी संधी देऊन देखील सिध्द करु शकले नाहीत. यावरुन जप्त करण्यात आलेला कडधान्यांचा हा साठा सार्वजनिक वितरण प्रणालीवर वितरीत करण्यासाठी संबंधीत राज्यांनी केलेल्या मागणीनुसार त्यांना विहित परिमाणात पुरवठा न करता कमी प्रमाणात पुरवठा करुन त्यापैकी शिल्लक असलेला कडधान्याचा साठा हा गैरमार्गाने साठवणूक केल्याचे सकृतदर्शनी दिसून येत असल्याने सदरचा साठा अवैध असल्याचे निष्पन्न होत आहे. सबब, मे. पी.ई.सी. लिमिटेड या कंपनीचा सिल करण्यात आलेला गोदाम क्र. ३ मधील ७२०.०० क्विंटल मुग व गोदाम क्र. ७ व ८ मधील अनुक्रमे ४५४९.०० क्विंटल व २८८०.०० क्विंटल असे मिळून एकूण ७४२९.०० क्विंटल तुर या कडधान्याचा संपूर्ण साठा शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणी मे. डीसीएम श्रीराम कन्सोलिडेटेड लि. या कंपनीच्या वतीने उपस्थित राहीलेले निखिल जे. पुणेवाला यांनी कंपनीच्या वतीने केलेल्या खुलाशात, ते निदर्शनास आणू इच्छितात की, त्या गोडावूनमध्ये आयात केलेले तूर ७६५ क्विंटल बाकी आहे. त्याची माहिती ते दर महिन्याला स्टॉक रिपोर्ट चर्चगेट ऑफिसला व पनवेल रेशनिंग ऑफिसला देत आले आहे. या निवेदनासोबत त्यांनी चर्चगेट रेशनिंग कार्यालयातील व पनवेल येथील सही शिक्का असलेले स्टॉक स्टेटमेंट झेरॉक्स प्रत जोडत असल्याचे तसेच माल अयात केल्याचा पुरावा म्हणून बी.एल. आणि बी.ई. ची कॉपी जोडत असल्याचे सांगितले आहे. डी. सी. एम. श्रीराम कन्सोलिडेटेड लि. यांचा गोदाम क्र. ७ मध्ये ७६५.०० क्विंटल तुर या कडधान्याचा साठा नमूद गोदामांवर जप्त करण्यात आलेल्या साठ्याच्या पुराव्यादाखल सादर केलेली कागदपत्रे पडताळली असता, आयात केलेला तुर या कडधान्याचा साठा त्यांनी बिल ऑफ एन्ट्री क्र. ९३९८४९ दिनांक ०९/११/२०१० रोजी एकूण ४५६१ बाचक्यांमध्ये २२८५.०६ क्विंटल, बिल ऑफ एन्ट्री क्र. ९८४८३२ दिनांक ०१/१२/२०१० रोजी एकूण २३६० बाचक्यांमध्ये ११८०.०० क्विंटल, बिल ऑफ एन्ट्री क्र. ६४९७३२ दिनांक ०७/०१/२०११ रोजी एकूण २४०० बाचक्यांमध्ये १२०२.४० क्विंटल व बिल ऑफ एन्ट्री क्र. ६५६१३६ दिनांक ११/०१/२०११ रोजी एकूण २४०० बाचक्यांमध्ये ११९७.३८ क्विंटल असे मिळून एकूण ११७२१ बाचक्यांमध्ये ५८६४.८४ क्विंटल तुर या कडधान्याचा साठा आयात केल्याचे उपलब्ध आयात संबंधीचे

कागदपत्रावरुन दिसून येत आहे. तथापि, मे. डीसीएम श्रीराम कन्सोलिडेटेड लि. यांनी आयात केलेल्या साठ्यापैकी साठा विक्रीचे तपशिल तसेच घटनास्थळी नमूद गोदामावर साठवणूक केल्याचे दिनांक व साठा याबाबतची माहिती त्यांनी सादर केलेली नाही. तथापी, मे. एकता वेअरहाऊस यांनी त्यांच्या स्तरावर साठापुस्तक म्हणून ठेवण्यात आलेल्या अभिलेखाची पडताळणी केली असता, मे. डीसीएम श्रीराम कन्सोलीडेट लि. यांनी तुरचा २४०० बाचक्यांमधील साठा दिनांक ०५/१२/२०१० व ०६/१२/२०१० रोजी वेअरहाऊसमध्ये साठवणूक केल्याचे दिसून येते. त्यापैकी दिनांक २२/०१/२०११ रोजी ४८० बाचके व दिनांक २५/०१/२०११ रोजी ६४० बाचके असे मिळून एकूण ११२० बाचक्यांचे वितरण दर्शविले असून उर्वरीत १२८० बाचक्यांमधील शिल्लक असलेला साठा हा सुमारे १३ महिन्यांपासून वितरण न करता सद्य:स्थितीत साठवणूक असल्याचे दिसून येत आहे. तसेच २३४५ बाचक्यांमधील साठा दिनांक १७/१२/२०१० रोजी वेअरहाऊसमध्ये साठवणूक केल्याचे दिसून येते. त्यापैकी दिनांक २२/०१/२०११ रोजी ३२० बाचके, दिनांक १३/०१/२०१२ रोजी ४०५ बाचके, दिनांक २७/०१/२०१२ रोजी ५५० बाचके, दिनांक ०३/०२/२०१२ रोजी ४१० बाचके व दिनांक ०४/०२/२०१२ रोजी ४१० बाचके असे मिळून एकूण २०९५ बाचक्यांचे वितरण दर्शविले असून उर्वरीत २५० बाचक्यांमधील शिल्लक असलेला साठा हा सुमारे १५ महिन्यांपासून वितरण न करता सद्य:स्थितीत साठवणूक असल्याचे दिसून येत आहे. म्हणजेच मे. डीसीएम श्रीराम कन्सोलिडेटेड लि. यांनी नमूद वेअरहाऊसमध्ये दिनांक ०५/१२/२०१० व ०६/१२/२०१० रोजी साठवणूक केलेला २४०० बाचक्यांमधील साठ्याचे शेवटचे वितरण त्यांनी दिनांक २५/०१/२०११ रोजी केल्याचे दिसून येत आहे. म्हणजेच तद्नंतर सुमारे वर्षभर सदरचा साठा आहे त्या स्थितीमध्येच जतन केल्याचे दिसून येते. तसेच दिनांक १७/१२/२०१० रोजी साठवणूक केलेला २३४५ बाचक्यांमधील साठ्याचे पहिले वितरण दिनांक २२/०१/२०११ रोजी करुन तद्नंतरचे वितरण सुमारे वर्षभरानंतर म्हणजेच दिनांक १३/०१/२०१२ ते ०४/०२/२०१२ या कालावधीत केल्याचे दिसून येते. म्हणजे मे. डीसीएम श्रीराम कन्सोलिडेटेड लि. यांचा नमूद गोदामामधील साठवणूक केलेला तुर या कडधान्याचा साठा हा साठेबाजी व नफेखोरीच्या उद्देशाने केला असून, सदर साठ्याचा त्यांना अधिकचा नफा मिळाल्यास ते विक्री करीत असून अन्यथा सदरचा साठा आहे त्या स्थितीमध्ये नमूद वेअरहाऊसमध्ये साठवणूक करीत असल्याचे सकृतदर्शनी दिसून येत आहे.

शासन परिपत्रक क्र. ईसीए-१००८/६२२/प्र.क्र.२८४/ना.पु.२३ दिनांक २० मे, २००८ अन्वये माहे नोव्हेंबर २०११ ते माहे जानेवारी २०१२ या तीन महिन्याचे मे. डीसीएम श्रीराम कन्सोलीडेट लि. यांनी या कार्यालयास सादर केलेल्या मासिक विवरणपत्रांच्या छायांकित प्रतिंचे अवलोकन करता मे. एकता वेअरहाऊसमध्ये साठवणूक केलेला तुर या कडधान्याचा साठ्यापैकी माहे नोव्हेंबर २०११ मध्ये ३७८५ बाचक्यांमधील १८८६.७० क्विंटल, माहे डिसेंबर २०११ मध्ये ३८६४ बाचक्यांमधील १९४४.९० क्विंटल व माहे जानेवारी २०१२ मध्ये १८३९ बाचक्यांमधील ९३७.१०

क्विंटल साठा शिल्लक असल्याचे नमूद आहे. तथापी, प्रत्यक्षात माहे जानेवारी २०१२ अखेरच्या मासिक विवरणपत्रामध्ये दर्शविण्यात आलेला ९३७.१० क्विंटल साठ्यापैकी नमूद गोदामावर ७६५.०० क्विंटल साठा साठवणूक केल्याचे दिसून येते. तसेच सदर मासिक विवरणपत्रामध्ये तीनही महिन्यात आवक व विक्रीचे तपशिल निरंक असताना सुध्दा वरील नमूद अखेर शिल्लकच्या आकडेवारीमध्ये तफावत आढळून येत आहे. म्हणजेच मे. डीसीएम श्रीराम कन्सोलिडेटेड लि. यांनी मासिक विवरणपत्रामध्ये दर्शविलेली कडधान्याची आकडेवारी दिशाभूल करणारी आहे.

केंद्र शासनाच्या आयात धोरणानुसार आयातदारास आयात शुल्कामध्ये १००% सुट देण्यात आली असून ज्यामुळे आयातदारांनी आयात केलेला कडधान्यांचा साठा हा जनसामान्यांच्या गरजेनुसार मुबलग प्रमाणांत स्थानिक बाजारपेठेत उपलब्ध झाल्यास व सदरचा पुरवठा नियमित राहिल्यास जीवनावश्यक वस्तूंचे दर स्थिर राहून महागाईवर नियंत्रण राहण्यास मदत होते. तथापी, मे. डीसीएम श्रीराम कन्सोलीडेट लि. यांनी सदरचा ७६५.०० क्विंटल तुर या कडधान्याचा साठा हा साठवणूक केल्यानंतर त्यापैकी पूर्णपणे विक्री न करता साठेबाजी व नफेखोरीच्या उद्देशाने स्वत:जवळ बाळगून ठेवला असल्याने परिणामी स्थानिक बाजारपेठेत कृत्रीम टंचाई निर्माण होऊन जीवनावश्यक वस्तुंच्या भाववाढ होण्यास प्रोत्साहन दिल्याचे निष्पन्न झाल्याने, पर्यायाने त्यांनी शासनाची व उपभोक्तांची फसवणूक करुन जीवनावश्यक वस्तू कायदा १९५५ च्या तरतुदींचा भंग केल्याचे सिध्द होत आहे. सबब, मे. डीसीएम श्रीराम कन्सोलीडेट लि. यांचा जप्त करण्यात आलेला ७६५.०० क्विंटल तुरचा संपूर्ण साठा शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई, मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये जप्त/सिल करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात पुढील आदेश देत आहे.

**आदेश :-**

१) प्रस्तूत प्रकरणी सिल करण्यात आलेला मे. पी.ई.सी. लिमिटेड या कंपनीचा गोदाम क्र. ३ मधील ७२०.०० क्विंटल मुग व गोदाम क्र. ७ व ८ मधील अनुक्रमे ४५४९.०० क्विंटल व २८८०.०० क्विंटल असे मिळून एकूण ७४२९.०० क्विंटल तुर या कडधान्याचा संपूर्ण साठा शासन जमा करण्यात यावा.

२) प्रस्तूत प्रकरणी सिल करण्यात आलेला मे. डीसीएम श्रीराम कन्सोलिडेटेड लि. या कंपनीचा गोदाम क्र. ७ मधील ७६५.०० क्विंटल तुर या कडधान्याचा संपूर्ण साठा शासन जमा करण्यात यावा.

३) सदर शासनजमा करण्यात आलेला संपूर्ण कडधान्याचा साठा उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांनी वैध परवानाधारकास प्रचलित दराने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची उप नियंत्रक शिधावाटप फ परिमंडळ यांनी विल्हेवाट लावून येणारी रक्कम वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई (Financial Advisor & Dy. Secretary, Food, Civil Supply & Consumer Protection Dept., Govt. of Maharashtra, Mumbai) यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात "४४०८" या लेखाशिर्षात जमा करावी.

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,

१) मे. पी.ई.सी. लिमिटेड चे व्यवस्थापक
२) मे. डीसीएम श्रीराम कन्सोलिडेटेड लि.
३) मे.एकता वेअरहाऊसिंगचे मालक
(उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांचे मार्फत)

प्रत,

१) उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल विनाविलंब या कार्यालयास सादर करावा.

२) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई. यांना माहितीसाठी अग्रेषित.

३) कार्यासन अधिकारी, का.क्र.५, दक्षता शाखा, प्रधान कार्यालय, मुंबई यांना माहितीस्तव अग्रेषित.

४) निवड नस्ती.

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.